**MHJN080011362022**

**भाग–अ**

**घनसावंगी येथील न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी – श्रीमती एल. पी. धन्वे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी)

(दिनांक ०७/१२/२०२३) **नि.क्र.३०**

नि. फौ. ख. क्र.१७९/२०२२

(गुन्हा क्र.३०३/२०२२ घनसावंगी पोलीस स्टेशन)

**फिर्यादी –** महाराष्ट्र सरकार तर्फे
पोलीस ठाणे अधिकारी घनसावंगी,
ता. घनसावंगी जि. जालना.

**सरकारतर्फे –** श्री. व्ही. यु. राठोड, सहा. सरकारी अभियोक्ता.

**आरोपी –**

१) मनीषा अशोक आरे,
वय ३६ वर्ष, धंदा– शेती,
रा. लोणी, (शाहजांपुर), ता. जि. बीड.

२) लहानु रमेश कारके,
वय ५६ वर्ष, धंदा– शेती,

३) सचिन रमेश कारके,
वय ३१ वर्ष, धंदा– शेती,
क्र.२ व ३ रा. टेंभी अंतरवाली,
ता. घनसावंगी, जि. जालना.

**आरोपींतर्फे विधीज्ञ –** श्री. व्ही. टी. पटेकर.

## <u>भाग–ब</u>

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १४/०८/२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | १६/०८/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | १४/१०/२०२२ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | १४/१०/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०९/११/२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | ०७/१२/२०२३ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०७/१२/२०२३ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | निरंक. |

## आरोपीची माहिती

| आरोपीचा अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | दोषी/ निर्दोष | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ च्या उद्देशाकरीता आरोपी खटल्या दरम्यान तुरुंगामध्ये असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनीषा अशोक आरे | १४/१०/ २०२२ | १४/१०/ २०२२ | भादंवि ३२४, ३२३ व ५०४ सह कलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २ | लहानु | १४/१०/ | १४/१०/ | भादंवि | निर्दोष | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रमेश कारके | २०२२ | २०२२ | ३२४, ३२३ व ५०४ सह कलम ३४ | मुक्तता | | |
| ३ | सचिन रमेश कारके | १४/१०/२०२२ | १४/१०/२०२२ | भादंवि ३२४, ३२३ व ५०४ सह कलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग–क

सरकार/बचावपक्ष/न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी –

अ. सरकारतर्फे साक्षीदार

| अ. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | मच्छींद्र नरहारी माळी | फिर्यादी |

ब. बचावपक्ष साक्षीदार – निरंक.

क. न्यायालयातर्फे साक्षीदार – निरंक.

सरकारतर्फे/बचावपक्षतर्फे/न्यायालयातर्फे निशाणी क्रमांकाची यादी.

अ. सरकारतर्फे – निरंक.

ब. बचावपक्षतर्फे – निरंक.

क. न्यायालयातर्फे – निरंक.

ड. भौतीक–वस्तु – निरंक.

## न्यायनिर्णय

( दिनांक ०७/१२/२०२३ रोजी पारीत )

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३ व ५०४ सह कलम ३४ अन्वये खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की :–**

२. फिर्यादी मच्छींद्र नरहारी माळी याने अशी तक्रार दाखल केली की, दि.१४/०८/२०२२ रोजी संध्याकाळी ०६.०० वाजेच्या सुमारास तो गावातुन रोडने घराकडे जात असताना आरोपी क्र.१ त्याला शिवीगाळ करुन लागली. म्हणुन त्याने आरोपी क्र.१ व २ ला विचारले की, तुम्ही विनाकारण का शिवीगाळ करता. तेव्हा आरोपी क्र.३ तेथे आला म्हणाला की, तु विनाकारण माझ्या बहिणीला व आईला का त्रास देतो. असे म्हणुन आरोपी क्र.३ ने फिर्यादीला शिवीगाळ करुन काठीने त्याच्या डोक्यात मारुन दुखापत केली. आरोपी क्र.१ व २ ने चप्पलाने मारहाण केली. बाळु पवार व शिवकन्या माळी यांनी भांडणाची सोडवासोडव केली. अशा आशयाची फिर्यादीने पोलीस स्टेशन घनसावंगी येथे तक्रार दिली.

३. फिर्यादीच्या रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन, घनसावंगी येथे अपराध क्र.३०३/२०२२ नुसार आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३ व ५०४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा नोंद केला. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी वैद्यकीय अधिकारी यांना पत्र पाठवून फिर्यादीची वैद्यकीय तपासणी करुन घेतली, वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले, घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जवाब नोंदविले, त्यांनी आरोपींच्या ताब्यातुन लाकडी काठी जप्त करुन जप्तीपत्रक तयार केले. आरोपींना अटक केले आणि तपासाअंती आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३ व ५०४ सह कलम ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.१४/१०/२०२२ रोजी आरोपींविरुध्द नि.क्र.१७ वर भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३ व ५०४ सह कलम ३४ अन्वये दोषारोप निश्चीत केले. त्यातील मजकुर आरोपींना त्यांच्या मातृभाषेतुन वाचुन व समजावुन सांगीतला. आरोपींनी गुन्हा नाकबुल करुन संपरीक्षेस जाण्याची तयारी दर्शविली.

**५.** खटल्यातील वरीलप्रमाणे आलेल्या माहीतीवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि.१४/०८/२०२२ रोजी संध्याकाळी ०६.०० वाजेच्या सुमारास मौजे टेंभी अंतरवाली, ता. घनसावंगी, जि. जालना येथे आरोपींनी संगनमत करुन आरोपींपैकी आरोपी क्र.३ ने फिर्यादीला काठीने डोक्यात मारुन ईच्छापूर्वक दुखापत पोहोचविली आणि अशाप्रकारे त्यांनी भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **.. नाही.** |
| २. | वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन आरोपींपैकी आरोपी क्र.१ व २ ने फिर्यादीला चापटबुक्यांनी मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत पोहोचविली आणि अशाप्रकारे त्यांनी भारतीय दंड विधानाचे कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **.. नाही.** |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ३. | वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत तुमचेपैकी आरोपी क्र.१ व २ ने फिर्यादीस शिवीगाळ करुन अपमानीत केले आणि अशाप्रकारे त्यांनी भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | .. नाही. |
| ४. | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**६.** प्रस्तुत खटल्यात आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने मच्छींद्र नरहारी माळी (स.सा.१) (फिर्यादी) यांची साक्ष नि.क्र.२५ वर नोंदविली आहे. खटला चालवित असतांना आरोपींविरुध्द गुन्हया संदर्भात कोणतीही विधाने आली नसल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ प्रमाणे आरोपींची जबानी नोंदविण्यात आली नाही. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दे क्र.१ ते ३ करीता :-**

**७.** साक्षीदार क्र.१ मच्छींद्र नरहारी माळी हे फिर्यादी असून त्याने त्याच्या साक्षीत सांगीतले की, ते आरोपींना ओळखतात व त्याच्याच गावात राहतात. त्या दिवशी त्याचा आरोपींसोबत शाब्दीक वादावादी झाली होती. या व्यतिरीक्त काहीही घडले नव्हते व त्याने पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली होती. प्रस्तुत साक्षीदार हा अभियोगपक्षाला सहकार्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात देखील

अभियोगपक्षास सहाय्य होईल असे काहीही या साक्षीदाराच्या साक्षीत आले नाही. प्रस्तुत साक्षीदाराने त्याच्या उलटतपासा दरम्यान बयाणामधील अधोरेखांकित भाग 'अ' हा पूर्णपणे नाकारला.

८. अशा परिस्थीतीत घटनेचे महत्वाचे साक्षीदार म्हणजेच स्वता: फिर्यादी यांनी शाब्दीक वादावादीशिवाय ईतर कोणतीही घटना झाली नसल्याचे नमुद केले आहे. आरोपी क्र.३ ने फिर्यादीला काठीने डोक्यात मारहाण करताना व आरोपी क्र.१ व २ ने शिवीगाळ व चापटबुक्यांनी मारहाण करताना पाहिलेला एकही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अभिलेखावर उपलब्ध नाही. स्वताः फिर्यादीने शाब्दीक वादीवादीशिवाय ईतर कोणतीही घटना झाली नसल्याचे कथन केल्यामुळे आरोपींनी फिर्यादीला काठीने मारले व चापटबुक्यांनी मारहाण केल्याचा कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर उपलब्ध झाला नाही. त्यामुळे आरोपींविरूध्द दोषारोपीत करण्यात आलेले गुन्हे सबळ पुराव्या अभावी सिध्द करण्यास अभियोगपक्षास अपयश आले आहे. सबब, मी मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करिता</u> :-**

९. उपरोक्त पुराव्याचे विश्लेषण करता व एकंदर कायदेविषयी परिस्थीतीचा बारकाईने विचार करता, आरोपी क्र.३ ने फिर्यादीला काठीने डोक्यात मारहाण केली व आरोपी क्र.१ व २ ने फिर्यादीला शिवीगाळ करुन चापटबुक्यांनी मारहाण केली ईत्यादी बाबी अभियोगपक्ष सिध्द करण्यास पुर्णत: अपयशी ठरला आहे. सबब, उपरोक्त गुन्हयातून आरोपींची निर्दोष मुक्तता करणे मला न्यायोचीत वाटते. परिणामत:, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ ते ३ यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३ व ५०४ सह कलम ३४ च्या

शिक्षापात्र गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त लाकडी काठी मुल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे अपील कालावधीपर्यंत प्रत्येकी रु.१५,०००/– किंमतीचा वैयक्तीक जातमुचलका सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.)

स्वा/–

**(एल. पी. धन्वे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी

दिनांक ०७/१२/२०२३. (न्यायालय क्र.२) घनसावंगी.